नवप्रभा

शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०१४

# सागर गवस वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**दोडामार्ग (न. प्र.)**

येथील पंचायत समितीने आयोजित केलेल्या तालुकास्तरीय महाविद्यालयीन पातळीवरील स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेत लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाचा सागर गवस हा सर्वप्रथम आला तर द्वितीय क्रमांक याच महाविद्यालयाची पौर्णिमा वराडकर हिने मिळविला. सागर गवस व पौर्णिमा वराडकर यांनी स्वच्छतेकडून समृद्धीकडे हे विषय स्पर्धेसाठी निवडले होते. विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. महाविद्यालयीन युवकांमध्ये युवकांमध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता या विषयावर जागृती व्हावी या उद्देशाने पंचायत समिती दोडामार्ग पुरस्कृत स्वच्छता मित्र या नावाने ही स्पर्धा दोडामार्ग कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित केली होती.